# जिल्हा परिषद, कोल्हापूर
## सामान्य प्रशासन विभाग,

नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला,
दालन क्र. १०७, नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३
फोन नं.०२३१-२६५५४१६ e-mail - dyceogenkop@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. क्र.कोजिप/साप्रवि/कावि -०५/९५८/२०२१ दि. ७/१२/२०२१

वाचले :- १) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा-१०९५/प्र.क्र३४-अ/आठ दि.११/०९/१९९६
२) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२/०८/२००५
३) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ दि.२१/०७/२०१७
४) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा/१२२१/प्र.क्र.१८६/का-८ दि.२६/०८/२०२१
५) या कार्यालयाकडील मंजुर टिपणी दि. /१२/२०२१

आदेश

संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील गट क व गट ड मधील सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराचे बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झालेवर एक वर्षाच्या आत अनुकंपा योजनेखाली अर्ज करावा असे विहित केले आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ चे शासन निर्णयानुसार पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे. त्यासाठी कर्मचारी दिवंगत झालेल्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच अनुकंपा प्रतिक्षासुची प्रसिध्द करताना ज्या उमेदवारांचे परिपुर्ण अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांचेच नाव प्रतिक्षासुचीमध्ये समाविष्ठ करणे बाबत संदर्भ क्र.४ चे शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित झालेले आहेत.

सद्यस्थितीत दि.३१ डिसेंबर २०२० अखेर प्राप्त झाले अर्जाची तात्पुरती जेष्ठता यादी या सोबत जोडली आहे. त्यावर काही दुरुस्ती / हरकती असलेस त्या बाबत लेखी स्वरुपात दि. १४/१२/२०२१ पर्यंत कळविणेत याव्यात. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी. सदरची यादी सा.प्र.वि.चे नोटीस बोर्ड व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर याद्वारे प्रसिध्द करणेत आली आहे.

(संजयसिंह चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

## सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर

### अनुकंपा योजनेखाली प्राप्त झालेल्या अर्जाची सन २०२० अखेरची जेष्ठता यादी प्रसिध्दी बाबत.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय दि.२२ ऑगस्ट २००५ अन्वये जिल्हा परिषदेकडील गट क व गट ड मधील सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा योजनेखाली नोकरी मिळणेसाठी केलेल्या अर्जाची सन २०२० अखेरची जेष्ठता यादी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे तसेच सदरची यादी प्रसिध्द करताना महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा/१२२१/प्र.क्र.१८६/का-८ दि.२६/०८/२०२१ नुसार ज्या उमेदवारांचे परिपुर्ण अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांचीच नावे सदरचे जेष्ठता यादीमध्ये समाविष्ठ करणेत आलेली आहेत. सदरची यादी जिल्हा परिषदेचे www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. या यादीवर काही हरकती / दुरुस्ती असलेस तसेच ज्यांची कागदपत्रे अपुर्ण आहेत. अशांनी या बाबतची पुर्तता दि. १४ /१२/२०२१ पर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जि.प.कोल्हापूर येथे समक्ष उपस्थित राहून करणेची आहे. मुदतीनंतर आलेल्या हरकती / दुरुस्ती यांचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता विहित मुदतीत न केलेस याबाबत त्याचा जेष्ठताक्रम डावलला गेलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. या बाबत केलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेत यावी.

(संजयसिंह चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर